# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-३९ दिनांक - ०७/०२/२०२४

## अल्पवयीन पिडीतेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीतास २४ तासात अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

दिनांक ०५/०२/२०२४ रोजी फिर्यादी यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात हजर राहुन तक्रार दिली की, त्यांचे शेजारी राहणारा आरोपीत याने तक्रारदार यांची मुलगी वय-०९ वर्षे हिस दिनांक ०४/०२/२०२४ रोजी संध्याकाळी ०६.०० ते ०७.०० वा.चे दरम्यान त्याचे राहते घरात बोलावुन लैगिक अत्याचार केलेबाबत पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I १३०/२०२४, भा.दं.वि.सं.कलम-३७६, ३७६ (अ) (ब) सह सह बालकांचे लैंगिक अपराधापासुन सरंक्षण अधिनियम-२०१२ चे कलम- ४, ६, ८, १२ प्रमाणे दिनांक ०५/०२/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन, मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळावर भेट देवुन, घटनास्थळावर मिळालेल्या तांत्रिक माहीती व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीताचा वसई, बोरीवली, मिरगाव, कुर्ला, मुंगई परीसरात कसोशिने कौशल्यपुर्वक शोध घेवुन, आरोपीत नामे.रामविलास बाबुलाल साहु वय-३७ वर्षे, रा.अकबर चाळ, धानिवबाग, नालासोपारा पुर्व, ता.वसई, यांस हा उत्तरप्रदेश राज्य येथे पळुन जाण्याच्या तयारीत असतांना यशस्वीरित्या ताब्यात घेवुन, त्यांस दि.०६/०२/२०२४ रोजी सदर गुन्हयात अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/अर्जुन पवार हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.कुमार गौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पोअं/रवि वानखेडे, संजय मासाळ, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील नेम.पेल्हार पोलीस ठाणे तसेच पोहवा./नामदेव ढोणे, पोअंम/सोहेल शेख नेम.पोलीस उप आयुक्त कार्यालय, परीमंडळ-३ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
पेल्हार पोलीस ठाणे